सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# जिल्हाधिकारी कार्यालय पुणे (महसूल शाखा) - ४११००१

E- mail - mahsulpune2@gmail.com Ph. No. 020 - 2611480

वाचले:- १) अध्यक्ष, गुंजवणी शिक्षण संस्था यांचेकडील पत्र क्र. २५/२०१८-१९ दि.१४/०३/२०१९
२) मा. अवर सचिव, महसुल व वनविभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन ज्ञापन क्र. जमीन ३४२००३/१६/प्र.क्र.पु.२९८/ज-५ दि. २७/०२/२००४
३) जिल्हाधिकारी कार्यालयाकडील आदेश क्र. पमह/कावि/३१७/२००४ दि.०५/०५/२००४
४) उपविभागीय अधिकारी हवेली यांचेकडील अहवाल क्र. जमीन/कावि/९९/२०२० दि.१७/०२/२०२०
५) शासन, महसूल व वन विभागाकडील शासन निर्णय क्र. जमीन-२०१८/प्र.क्र.९१/ज-१, दि.१६ नोव्हेंबर, २०१८
६) सचिव, गुंजवणी शिक्षण संस्था यांचेकडील पत्र क्र. १३/२०२२ दि.२०/१०/२०२२
७) महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींची विल्हेवाट लावणे) नियम १९७१ चे नियम ७

जिल्हाधिकारी कार्यालय पुणे
(महसूल शाखा)
क्र. पमह/सीआर/९६ /२०२२
पुणे १ दिनांक:- /११/२०२२.
4/11/2022

जिल्हाधिकारी सत्यमेव जयते पुणे

**विषय:-** मौजे आंबेगाव बु. ता. हवेली जि.पुणे येथील सं.नं. ६५ मधील क्रिडांगणासाठी २१००.०० चौ.मी क्षेत्रास भाडेपट्टयाची मुदतवाढ देणेबाबत...

आदेश/-

ज्याअर्थी, अध्यक्ष, गुंजवणी शिक्षण संस्था यांनी या कार्यालयाकडे दि. १४/०३/२०१९ रोजी अर्ज करुन मौजे आंबेगाव बु. ता. हवेली जि.पुणे येथील सं.नं. ६५ मधील क्रिडांगणासाठी २१००.०० चौ.मी क्षेत्रास भाडेपट्टयाची मुदतवाढ मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

२. त्याअनुषंगाने तहसिलदार हवेली यांनी उपविभागीय अधिकारी हवेली यांचेमार्फत त्यांचेकडील पत्र क्र. जमीन/कावि/९९/२०२० दि.१७/०२/२०२० अन्वये मौजे आंबेगाव बु. ता. हवेली येथील जमीन सं.नं. ६५ पै. क्षेत्र ० हे ४१ आर क्षेत्र अध्यक्ष, गुंजवणी शिक्षण संस्था हातवे बु. ता. भोर जि.पुणे यांना भाडेपटटयाने प्रदान करणेत आलेली आहे. मौजे आंबेगाव बु. ता. हवेली येथील सं.नं. ६५ पै. क्षेत्र ० हे ४१ आर क्षेत्र संबंधित संस्था यांचे ताब्यात असुन विषयांकीत मिळकतीवर एकसारखे दोन मजली इमारत आहे. यामध्ये शाळेच्या वर्गखोल्या, ऑफीस सायन्स लॅब ग्रथालय असुन मुलांचे खेळाचे मैदान मोकळे आहे. विषयांकीत मिळकतीस कंपाऊड असुन संपुर्ण मिळकतीचा वापर शैक्षणिक कारणांसाठी होत आहे. सदर मिळकतीच्या पुर्वेस कासेगाव शिक्षण संस्था दक्षिणेस सं.नं. ७ पश्चिमेस स.नं. ८ उत्तरेस सं.नं. १० व ९ असलेचे अहवालामध्ये नमुद केलेले आहे.

३. गुंजावणी विभाग विकास महामंडळ हातवे बु. ता. भोर या संस्थसे शासन महसुल व वनविभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन ज्ञापन क्र. जमीन ३४२००३/१६/प्र.क्र.पु.२९८/ज-५ दि. २७/०२/२००४ अन्वये मौजे आंबेगाव बु. ता. हवेली जि.पुणे येथील सं.नं. ६५ मधील २१००.०० चौ.मी क्षेत्र प्रति वर्ष नाममात्र रुपये १/- भाडे आकारुन १५ वर्षाच्या कालावधीसाठी भाडेपटटयाने शाळेच्या क्रिडांगणासाठी

या कार्यालयाकडील आदेश क्र पमह/कावि/३१७/२००४ दि.०५/०५/२००४ अन्वये भाडेपट्टयाने १५ वर्षाकरीता प्रदान करण्यात आले आहे.

४. **ज्याअर्थी, शासन, महसूल व वन विभागाकडील शासन निर्णय क्र. जमीन-२०१८/प्र.क्र.९१/ज-१, दि.१६ नोव्हेंबर, २०१८ अन्वये क्रिडांगण किंवा खेळाचे मैदान, व्यायामशाळा या प्रयोजनासाठी भाडेपट्टयाने प्रदान केलैल्या शासकीय जमिनीवरील भाडेपट्याचे नुतनीकरण करताना जमिनीच्या प्रचलित वार्षिक दर विवरण पत्रानुसार मुल्यांकनाच्या १० टक्के रकमेच्या ०.१ टक्के इतकी रक्कम वार्षिक भुईभाडयाची रक्कम आकारुन मुळ जमीन प्रदान आदेशातील अटी शर्तीच्या अधीन राहून ३० वर्षाचे भाडेपट्टयाची मुदतवाढ देण्यात यावी. अशी मुदतवाढ देताना ज्या भाडेपट्टयांचा कालावधी या शासन निर्णयाच्या दिनांकापुर्वी संपुष्टात आलेला व ज्या भाडेपट्टयांचे अद्याप नुतनीकरण करण्यात आलेले नाही, अशा भाडेपट्टयांचे मानीव नुतनीकरण भाडेपट्टा संपुष्टात आल्याच्या दिनांकापासून दि.३१.१२.२०१७ पर्यंत जुन्या दराने भुईभाडे वसुल करुन करण्यात यावे व दि.०१.०१.२०१८ पासुन प्रस्तुत धोरणानुसार भुईभाडे वसुल करुन भाडेपट्टयाचे पुढील नुतनीकरण करण्यात यावे अशी तरतुद करण्यात आलेली आहे.**

प्रस्तुत संस्थेस जमीनीच्या वार्षिक मुल्यदर तक्त्याच्या विवरण पत्रानुसार येणाऱ्या मुल्यांकन रक्कम रुपये **२३१६३०००**/- या रकमेच्या १० टक्के रक्कम रुपये **२३१६३००**/- या रकमेच्या ०.१ टक्का रक्कम रुपये **२३१७/- इतकी होत आहे.** त्यानुसार दिनांक १६/११/२०१८ रोजीचे शासन निर्णयानुसार दिनांक दि.०१/०१/२०१८ ते ३१/१२/२०२१ पर्यंत भुईभाडे म्हणून होणारी एकुण रक्कम रुपये ६९५१/- इतकी रक्कम रुपये संस्थेने दि.३०/०१/२०२१ रोजी GRN No. MH०१०८६८४९३२०२०२१M अन्वये (GRAS) प्रणालीव्दारे शासकीय खजिन्यात जमा केले असून संदर चलन डिफेस झाले आहे.

त्याअर्थी **मी, डॉ राजेश देशमुख, जिल्हाधिकारी पुणे,** मला प्रदान केलेल्या अधिकारान्वये शासन निर्णय क्र. जमीन-२०१८/प्र.क्र.९१/ज-१, दि.१६ नोव्हेंबर, २०१८ मधील तदतुदीनुसार गुंजवणी विभाग विकास महामंडळ हातवे बु. ता. भोर जिल्हा पुणे यांना मौजे आंबेगाव बु. ता. हवेली जि.पुणे येथील सं.नं. ६५ मधील क्रिडांगणासाठी २१००.०० चौ.मी क्षेत्रास मुळ जमीन प्रदान आदेशातील अटी शर्तीच्या अधीन राहून खालील अटी व शर्तीवर दि. ०१/०१/२०१८ पासून दि.३१/१२/२०४८ या ३० वर्षांकरीता भाडेपट्टयास मुदतवाढ देणेस मंजुरी देत आहे.

अटी व शर्ती:-

१. प्रस्तुत संस्थेस क्रिडांगणाच्या भाडेपट्टयाचे मुदतवाढ दिलेल्या क्षेत्राचा वापर त्याच प्रयोजनासाठी करणे प्रतिग्रहीता संस्थेस बंधनकारक राहील.
२. प्रस्तुत संस्थेस मुळ जमीन प्रदान केलेल्या आदेशातील अटी शर्ती प्रतिग्रहीता संस्थेस बंधनकारक राहतील.
३. शासन निर्णय दि.१६ नोव्हेंबर, २०१८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे क्रिडांगणाच्या जमिनीच्या दरसाल प्रचलित वार्षिक दर विवरण पत्रानुसार येणाऱ्या मुल्यांकनाच्या १० टक्के रकमेच्या ०.१ टक्के इतकी वार्षिक भुईभाडयाची रक्कम शासनाकडे/ तहसिलदार हवेली/तलाठी यांचेकडे भरणे संस्थेस बंधनकारक राहील.
४. सदर संस्थेच्या क्रिडांगणाचे क्षेत्राकरीता भाडेपट्टयाची मुदत ही दि.०१/०१/२०१८ पासून दि.३१/१२/२०४८ या ३० वर्षांकरीता असून तशी नोंद ७/१२ चे इतर हक्कात घेण्यात यावी.
५. सदर संस्थेस मुदतवाढ दिलेल्या भाडेपट्टयाच्या जागेबाबत शासन परिपत्रक क्र.संकिर्ण-०५/२००६/ प्र.क्र.४३/ज-१, दि.३१ ऑक्टोबर, २००६ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ नुसार करारनाम्याचा दस्त निष्पादित करणे प्रतिग्रहीता यांचेवर बंधनकारक राहील.
६. विषयांकीत मिळकतीबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाकडील दि.०५/०५/२००४ रोजीच्या मुळ जागा प्रदान आदेशातील अटी शर्ती अर्जदार संस्थेवर बंधनकारक राहतील.
७. विषयांकीत मिळकतीवर उभारण्यात आलेल्या क्रिडांगण/ शैक्षणिक संकुलाच्या इमारतीमध्ये केंद्र व राज्य शासनाच्या विविध विभागाकडुन घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षा, तसेच सार्वत्रिक निवडणुका, राज्य शासनाच्या निर्देशानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन राबविण्यात येणारे सार्वजनिक उपक्रम यासाठी वेळोवेळी सदरची खुली जागा, जागेवरील इमारत व तदनुषंगिक उपलब्ध असलेली तांत्रिक यंत्रसामुग्री, तांत्रिक मनुष्यबळ विनासायास व विनामुल्य तातडीने उपलब्ध करुन देणे प्रतिग्राहिता यांचेवर बंधनकारक राहील.

८. प्रतिग्रहीता यांनी सदर आदेशातील वरील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर हमीपत्र सादर करणे प्रतिग्रहीता यांचेवर बंधनकारक राहील.

९. संस्थेने वरील अटी व शर्तींचा भंग केल्यास सदर जमीन शर्तभंगात काढून घेवून सरकार जमा केली जाईल.

(डॉ राजेश देशमुख)
जिल्हाधिकारी पुणे

प्रति,

अध्यक्ष,
गुंजवणी विभाग विकास महामंडळ
हातवे बु. ता. भोर जि.पुणे

महाराष्ट्र शासन

वर्ष : २०२२-२३

गाव नमुना आठ - अ
धारण जामिनींची नोंदवही (कृषिक)

( आसामीवार खतावणी --जमाबंदी पत्रक )

अहवाल दिनांक : २८-०६-२०२३

गाव: आंबेगाव बु.  तालुका: हवेली  जिल्हा: पुणे

**खाते क्रमांक :** ९७५२ ( संयुक्त खाते ) **खातेदारांची नावे :** अध्यक्ष गुंजवणी विभाग विकास ,महामंडळ हातवे बु. ता. भोर .

| गाव नमुना सहा मधील नोंद | भूमापन क्रमांक व उपविभाग क्रमांक | क्षेत्र | | | वसुलीसाठी | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | लागवडी योग्य क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | पोटखराब क्षेत्र (लागवडी योग्य नसलेले) (हे.आर.चौ.मी) | एकूण क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकारणी किंवा जुडी | दुमाला जमिनीवरील नुकसान. | स्थानिक उपकर जि.प. | स्थानिक उपकर ग्रा. प. | |
| (१) | (२) | (३अ) | (३ब) | (३क) | (४) | (५) | (६अ) | (६ब) | (७) |
| | ६५ | ०.०००० | ०.२००० | ०.२००० | ० | ० | ० | ० | ० |
| | एकूण | ०.०००० | ०.२००० | ०.२००० | ० | ० | ० | ० | ० |

टीप :- उक्त रकाना क्र.३(अ) मधील लागवडी योग्य क्षेत्र हेच आकारणीस पात्र राहील. पोटखराब क्षेत्रावर आकारणी लागू नाही.

हा खाते उतारा अभिलेख ७/१२ च्या डीजिटल स्वाक्षरीत डेटा वरून (दि. १९/१०/२०२२ वेळ ०४:२८:५८ PM रोजी) तयार झाला असल्यामुळे यावर कोणाच्याही सही-शिक्याची आवश्यकता नाही. ८-अ डाउनलोड व वैध दि. : २८/०६/२०२३ वेळ : ०९:५५:५६ AM. , वैधता ०७२००००१०२५५९१२५ हा पडताळणीक्रमांक वापरून https://digitalsatbara.mahabhumi.gov.in/dslr/ वरून तपासावी.



Digitally signed

महाराष्ट्र शासन

# गाव नमुना सात ( अधिकार अभिलेख पत्रक )

[ महाराष्ट्र जमीन महसुल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम १९७१ यातील नियम ३,५,६ आणि ७]

गाव :- **आंबेगाव बु. ( ५५६२४२ )** तालुका :- **हवेली** जिल्हा :- **पुणे**

ULPIN : **37792025129** भूमापन क्रमांक व उपविभाग **६५** **37792025129**

भुधारणा पद्धती **सरकार** शेताचे स्थानीक नाव :

| क्षेत्र, एकक व आकारणी | |
|---|---|
| क्षेत्राचे एकक | **हे.आर.चौ.मी** |
| अ) लागवड | योग्य क्षेत्र |
| जिरायत | - |
| बागायत | - |
| एकुण | - |
| ला.यो. क्षेत्र | |
| ब) पोटखराब क्षेत्र | |
| (लागवड | अयोग्य) |
| वर्ग (अ) | १.२१.०० |
| वर्ग (ब) | - |
| एकुण | |
| पो.ख.क्षेत्र | १.२१.०० |
| एकुण क्षेत्र (अ+ब) | १.२१.०० |
| आकारणी | ०.०० |
| जुडी किंवा आकारणी | विशेष |

| खाते क्र. | भोगवटादाराचे नाव | क्षेत्र | आकार | पो.ख. | फेरफार क्र |
|---|---|---|---|---|---|
| ३४३५ | **कासेगाव शिक्षण संस्था कासेगाव** | | | ०.८००० | ( २१३२७ ) |
| ९७५२ | **महामंडळ हातवे बु. ता. भोर** | | | | ( २१३२७ ) |
| | **अध्यक्ष गुंजवणी विभाग विकास** | | | ०.२००० | ( २१८९० ) |
| | ------सामाईक क्षेत्र------ | ०.०००० | ०.०० | ०.२००० | |
| १०५१६ | **महाराष्ट्र शासन** | | | ०.२१०० | ( २१८९० ) |

**कुळ, खंड व इतर अधिकार**

कुळाचे नाव व खंड

इतर अधिकार

इतर

- ( २०७९ )

इतर

**पुणे महानगरपालिकेकडे देखभालीसाठी ( ९६५१ )**

नवीन अविभाज्य शर्त

- ( १२७८६ )

इतर

- ( १२७९५ )

भाडे तत्वाने

**क्रिडांगणासाठी क्षेत्र ०.२१०० हे.आर.चौ.मी. अध्यक्ष गुंजवणी विभाग विकास महामंडळ हातवे बु. ता. भोर साठी रक्कम रुपये १/- वार्षीक भाडे ( २१८९० )**

प्रलंबित फेरफार : **नाही.**

शेवटचा फेरफार क्रमांक : **२१८९०** व दिनांक : **११/१०/२०२२**

जुने फेरफार क्र : (२०७९) (१२७९५) (१९३०२) (१९९६७) (२११९१) (२१३२७)

सीमा आणि भुमापन चिन्हे


ई महाभूमि
भूमिअभिलेख विभाग

## गाव नमुना बारा ( पिकांची नोंदवही )

**[ महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे ) नियम १९७१ यातील नियम २९ ]**

गाव :- **आंबेगाव बु. ( ५५६२४२ )** तालुका :- **हवेली** **जिल्हा :- पुणे**

भुमापन क्रमांक व उपविभाग **६५**

| | | | पिकाखालील क्षेत्राचा तपशील | | | | | लागवडीसाठी उपलब्ध नसलेली जमीन | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वर्षे | हंगाम | खाते क्रमांक | पिकाचा प्रकार | पिकांचे नाव | जल सिंचित | अजल सिंचित | जल सिंचनाचे साधन | स्वरूप | क्षेत्र | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| **२०१७** | **खरीप** | | | | | ०.० | | **गायरान पड** | ०.०००० | |
| **२०१८** | **खरीप** | | | | | ०.० | | **गायरान पड** | ०.०००० | |
| **२०१९** | **खरीप** | | | | | ०.० | | **गायरान पड** | ०.०००० | |

टीप : ** सदरची नोंद मोबाइल ॲप द्वारें घेणेत आलेली आहे

ई महाभूमि
भूमिअभिलेख निर्गमात्